**प्रेसनोट** **दि. २४.०६.२०२५**

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आरोपी लोकसेवक १) श्री. रावसाहेब बापुराव काकडे, वय ५७ वर्ष, व्यवसाय– तलाठी, रा. पटवारी कॉलनी, सिंदखेडराजा ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा २) मनोज काशीनाथ झिने, वय ४९ वर्ष, व्यवसाय– महसुल सहायक रा. सिव्हील कॉलनी देऊळगावराजा ता. देऊळगावराजा जि. बुलढाणा |
| लाच मागणी रक्कम व दिनांक | ७,०००/–रुपये, दि. २०.०५.२०२५ |
| लाच स्विकारली रक्कम व दिनांक | ७,०००/–रुपये, दि. २४.०६.२०२५ |
| घटनास्थळ | तहसिल कार्यालय सिंदखेडराजा, जि. बुलढाणा |
| घटना तारीख | २४.०६.२०२५ रोजी |

**थोडक्यात हकीकत :–**

यातील हकीकत अशाप्रकारे आहे की, मौजे तांदुळवाडी शिवार ता. सिंदखेडराजा येथील गट नं. २४ मधील तक्रारदार व त्यांचे भावाचे नावावरील जमीन महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६ कलम ८५(२) प्रमाणे जमिनीचे आपसात वाटणी करून तक्रारदार यांच्या आईचे नाव ७/१२ उता–यावर लावणेबाबत तहसिलदार सिंदखेडराजा यांचेकडुन आदेश करून देण्यासाठी आलोसे क्र. १ श्री. काकडे तलाठी खामगाव सज्जा यांनी ७००० रू. देवुन टाकणे बाबत प्रोत्साहन दिले व आलोसे महसुल सहायक श्री. मनोज झिने यांनी ७००० रू. लाचेची मागणी करून ७०००/– रू. लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. वरून त्यांचेविरूध्द पोलीस स्टेशन सिंदखेडराजा जि. बुलढाणा येथे कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

सदरकार्यवाही :–

१.मा.श्री. मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती
२.मा.श्री. सचिंद्र शिंदे, अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक, पोलीस निरीक्षक, श्री. रमेश पवार, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा, व सोबत सापळा पथक एएसआय, शाम भांगे, पोहेकॉ. प्रविण बैरागी, राजेंद्र क्षिरसागर, पोना/ जगदिश पवार, विनोद लोखंडे, पोकॉ. शैलेश सोनवणे, रंजीत व्यवहारे, चापोना नितीन शेटे, चापोकॉ/शेख अरशद, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टीकरप्शन ब्युरो बुलढाणा, कार्यालय **दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ९५५२५२०१८८** तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी केले आहे.

(भागोजी चोरमले)
पोलीस उपअधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा

Scanned with OKEN Scanner